नमूना-2

जाक.जिप.शिवी.प्रा-2 /149/2022
शिक्षण विभाग (प्रा.) जि.प.परभणी,
दिंनाक- 06/01/2023.

प्रति,
मुख्याध्यापक,
पोदार इंटरनॅशनल स्कूल,जिंतूर रोड,उत्तमराव देशमूख फार्मसी कॉलेज
जवळ धर्मापूरी शेजारी टाकळी कु. ता.परभणी

**विषय-बालकाचा मोफत वसक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 यांच्या कलम 18 च्या प्रयोजनार्थ बालाकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम 2011 पोट नियम (4) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्या बाबत.**

संदर्भ-1. शासन निर्णय शालेय् शीक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई क्रंमाक-एसएसए-2013/प्र.क्र.75/प्राशी-4 दिंनाक-29 जुन 2013

2. गट शिक्षणाधिकारी ,पंचायत समिती परभणी यांचे पत्र जाक्र-1863/2022 दिंनाक-20/12/2022

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती परभणी यांनी शाळेची केलेली तपासणी अहवालाच्या आधारे मी शिक्षणाधिकारी (प्रा.), शिक्षण विभाग जिल्हा परिषद परभणी यांना दिंनाक-20/12/**2022 ते 19**/12/**2025** या तीन वर्षाच्या कालावधीसाठी पोदार इंटरनॅशनल स्कूल,जिंतूर रोड,उत्तमराव देशमूख फार्मसी कॉलेज जवळ धर्मापूरी शेजारी टाकळी कु. ता.परभणी या शाळेस RTE मान्यता प्रमाणपत्र देण्यात येते.

**<u>वरिल मान्यता ही खालील शर्तीच्या पुर्ततेच्या अधिन आहे.</u>**

1)मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवी नंतर मान्यता किंवा सलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.

2)बालाकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम 2009 (जोडपत्र एक ) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम 2011 (जोडपत्र दोन) मधिल तरतुदीचे शाळा पालन करीन.

3)शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचीत गटातील बालकांना पहिल्या इयत्तेत त्या इयत्तेतील विदयार्थी संखेच्या किमान 25% मर्यादे पर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होई पर्यत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की,पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.

4)परिच्छेद 3 निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम 12(2) नुसार प्रतिपूर्ती मिळेल.अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वातंत्र बॅक खाते देण्यात येईल.

5)संस्था/शाळा कोणतीही कॅपीटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्याच्या किंवा तीच्या माता-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.

6)कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी,धर्म,जात किंवा वंश,जन्म ठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

(एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्या इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

(दोन)कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यत कोणत्याही मंडळाची परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आसणार नाही.

(चार) प्राथमिक शिक्षण पुर्ण केलेल्या प्रत्येक बालकास नियम 23 अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

(पाच) विकलांग/विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्याच्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करण्यात येईल.

(कृपया मागे-- )

(सहा) अधिनियमाच्या कलम 23(1) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतू आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारणन करणा-या शिक्षकांना अशी किमान अर्हता 5 वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम 24(1) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्य त्याची/तीची कर्तव्ये शिक्षक पारपाडतील आणि

(आठ) शिक्षकाने/शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वत:ला गुंतवून घेवू नये याची सुनिश्चिती शाळा करील

7) शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमाचे पालन करीन.

8) शाळा अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विहीत केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

9) शाळा अधिनियमाच्या कलम 19 विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालील प्रमाणे होत्या :

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ .
- एकूण बांधकाम क्षेत्र.
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ .
- वर्गखोल्यांची संख्या.
- कार्यालय-नि-भांडार-मुख्याध्यापकाची खोली
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृह जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृह स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थिती ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल .
- पिण्याच्या पाण्याची सुविधा.
- दुपारचे जेवण शिजवण्यासाठी स्वयंपाकघर.
- अध्यापन अध्ययन साहित्य/खेळ व क्रिडाविषयक सामग्री/ग्रंथालय यांची उपलब्धता.
- वाचन साहित्य विनासायास उपलब्ध.

10) मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविता येणार नाहीत.

11) शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रिंडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येईल.

12) शाळा सोसायटी नोंदणी अधिनियम 1860 (1860 चा 21) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1950 अन्वये नोंदणी झालेल्या संस्थामार्फत चालविण्यात येत आहे.

13) शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायदयाकरिता किंवा कोणत्याही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

14) शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करून घ्यावेत आणि नियमानूसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिका-यांकडे पाठवण्यात यावी.

15) तुमच्या शाळेला मिळालेल्या मान्यता संकेतांक- ------------------------असा आहे. कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करतांना कृपया नमुद करावा याची नोंद घ्यावी.

16) शिक्षण संचालक/जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्ती निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

17) संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नुतनीकरण केल्याची सुनिश्चिती करावी.

18) जोडपत्र (तीन) नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

**शिक्षणाधिकारी (प्रा.)**
**जिल्हा परिषद, परभणी.**